# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/01/2023 (सोमवार) सायंकाळ

---

### विनयभंग

पो.स्टे. उमरेड :— दिनांक ०१/०१/२०२३ चे १३.३० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय ३५ वर्ष व आरोपी नामे— फिर्यादी व आरोपी हे नातेवाईक असुन फिर्यादी ही मजुरीचे तसेच मेसचे डबे बनविण्याचे काम करित असते. फिर्यादीने सचिन चंद्रभान किरमिरे यास डबे घेवुन जा म्हणुन फोन केला असता आरोपी क्र. १) दिनेश भुडे वय ४५ वर्ष याने ''तु त्याला कशाला फोन केली तुझा व त्याचा संबंध काय, यांनतर तुझा मेस बंद कर'' असे म्हणुन शिवीगाळ करून फिर्यादीच्या अंगावर धावुन आला असता त्याच्या तावडीतुन सुटुन फिर्यादी बाहेर आली असता आरोपी क्र. २) गणेश भुडे, वय ४० वर्ष व ३) वसंता भुडे, वय ७५ वर्ष हे अंगणात उभे होते त्यांनी फिर्यादीला अडवले व आरोपी क्र. ३ यांनी सार्वजनिक ठिकाणी रोडवर थांबवुन फिर्यादीची साडी ओढुन सोडली व आरोपी क्र. १) व २) यांनी फिर्यादीचा विनयभंग केला व डबा घेण्याकरिता आलेला सचिन किरमरे यास आरोपी क्र. २) यांनी आरोपी क्र. ३) व ४) सुधाकर भुडे, वय २५ वर्ष ५) विशाल भुडे वय २६ सर्व रा. बेसुर यांना बोलावुन आपल्या घरी कशाला येतो असे म्हणुन बाजुला असलेल्या लाकडी काठीने त्यास सार्वजनिक ठिकाणी मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ ब ३२४, २९४, १४३, १४७, १४८ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. १), २), ४), ५) आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. शितल खोब्रागडे पो.स्टे उमरेड मो. क्र. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर